मांडवा ते भाऊचा धक्का दरम्यान येथे रो-रो सेवेकरीता नौकानयन मार्गातील गाळ काढण्याच्या कामाकरीता अंदाजे रू.१८.१२ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः ममेबो-०६१७/प्र.क्र.१४२/बंदरे-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०४ जानेवारी, २०१८

वाचा:-१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे पत्र क्र. ममेबो/ मु.का.अ./ अभि-३/मांडवा रो-रो-जेट्टी, ब्रेकवॉटर/२८५, दिनांक २१.०६.२०१७.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयडब्ल्यूटी/०२१५/प्र.क्र.२१/बंदरे-१, दि.३०.०६.२०१५.

प्रस्तावना:

मुंबईच्या किनारपट्टीवरील जलवाहतुक प्रकल्पांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून संदर्भ क्र.२ अन्वये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास घोषित करण्यात आले आहे. मांडवा ते भाऊचा धक्का अशी रो-रो सेवा चालू करण्याच्या दृष्टीकोनातून नौकानयन मार्गाची रूंदी १५० गृहीत धरून २.५० मीटर पाण्याची खोली करण्याकरीता ३,९६,६२० घन मीटर गाळ काढणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने रू.१८.१२ कोटी इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर प्रकल्पास सागरमाला कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून ५०% निधी प्राप्त करण्याचे नियोजीत असून सदर कामाच्या रू.१८.१२ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

मांडवा ते भाऊचा धक्का दरम्यान येथे रो-रो सेवेकरीता नौकानयन मार्गातील गाळ काढण्याच्या कामाकरीता अंदाजे रू.१८.१२ कोटी (रूपये अठरा कोटी बारा लक्ष फक्त) किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

२. याबाबत होणार खर्च -मागणी क्र.७, लेखाशीर्ष क्र. ३०५१- बंदरे व दिपगृहे, ०२- लहान बंदरे, (१९०), सार्वजनिक उपक्रम व इतर उपक्रमांना सहाय्य, (००)(०३) जेट्टीच्या बांधकामाकरीता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (राज्य हिस्सा ५०%) (३०५१ १८९१), ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)◦ या लेखाशीर्षाखालील तरतुदींमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकावा.

३. सदरचे काम ०४ महिन्यांत पूर्ण करण्यात यावे.

४. सदर कामाकरीता राज्य शासनावर भविष्यात कोणताही आर्थिक बोजा व पर्यावरणाचे किंवा न्यायालयीन दायित्व येणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांची राहील.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२७१/का.१४६१, दिनांक २२.११.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४१६/२०१७/व्यय ८, दिनांक २६.१२.२०१७ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०१०४१७०६००१७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hanmanlu Damayyawar

Digitally signed by Ashok Hanmanlu Damayyawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2bd0dc6138e4f3c9997616b47f0dc918cd4715f466afd0623c843397ffc06a09, serialNumber=2cc45c1c1345a8b6ff1e9fdbd2d12c6527f6d070c05b708bcc57b79b7ef3a95d, cn=Ashok Hanmanlu Damayyawar
Date: 2018.01.04 17:12:54 +05'30'

(अ. ह. दमय्यावार)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
४) मा. राज्यमंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव यांचे उपसचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय,
६) अ.मु.स.(वित्त), मंत्रालय मुंबई,
७) अ.मु.स.(नियोजन), मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव (बंदरे), मंत्रालय, मुंबई,
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
१०) निवडनस्ती (बंदरे-२).